# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:18.05.2026** **वार: सोमवार**

---

1. पुढच्या वर्षापासून राज्यव्यापी 'पुणे कृषी नवसंकल्पना स्पर्धा' घेणार-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा, मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पुण्यात विविध विकासकामांसह कर्करोग रुग्णालयाचं उद्घाटन
2. बंगळुरू-मुंबई नव्या एक्सप्रेस रेल्वेला केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दाखवला हिरवा झेंडा
3. नीट पेपरफुटी प्रकरणी सीबीआयकडून नांदेडमध्येही चौकशी, आरोपी मनीषा मांढरेला 14 दिवसांची सीबीआय कोठडी
4. साताऱ्यात पार पडलेल्या 52 व्या हिंदकेसरी कुस्ती स्पर्धेत महेंद्र गायकवाडनं पटकावली विजेतेपदाची गदा आणि
5. ज्येष्ठ टाळवादक हरीभक्तपरायण माऊली टाकळकर यांचं निधन

**<u>मुख्यमंत्री</u>**

शाश्वत, तंत्रज्ञानाधारित आणि उत्पादनक्षम शेतीसाठी आधुनिक संशोधन आणि नवकल्पनांची जोड आवश्यक असून कृषी नवसंकल्पना स्पर्धेसारखे उपक्रम भविष्यातील कृषी व्यवस्थेला नवी दिशा देणारे ठरत आहेत, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल पुण्यात केलं. कृषी विभागाच्यावतीनं कृषी महाविद्यालयात आयोजित दुसऱ्या 'पुणे कृषी नवसंकल्पना स्पर्धा-2026'च्या समारोप आणि पारितोषिक वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. पुढील वर्षापासून 'पुणे कृषी नवसंकल्पना स्पर्धा' राज्यव्यापी स्वरूपात आयोजित करण्यात येईल तसेच स्पर्धेतील प्रथम पुरस्कार दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नावाने दिला जाईल, अशी घोषणाही त्यांनी केली. यंदाच्या स्पर्धेतील 18 निवडक नवकल्पनांना पुढील टप्प्यात विशेष मदत आणि मार्गदर्शन देण्यात येईल. त्यापैकी किमान 12 प्रकल्प बाजारात यावेत यासाठी शासन प्रयत्नशील राहील, अशी ग्वाहीही फडणवीस यांनी दिली.

पुणे महानगरपालिका आणि आपुलकी हेल्थकेअर यांनी संयुक्तपणे उभारलेल्या अत्याधुनिक कर्करोग केंद्राचं लोकार्पण देखील काल पुण्यात मुख्यमंत्र्याच्या हस्ते झालं. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, मंत्री चंद्रकांत पाटील, महापौर मंजुषा नागपुरे, यांच्यासह अन्य मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते.

यावेळी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले.....

**दुर्दैवाने कॅन्सर हा रोग अतिशय वेगाने वाढतोय वेळेत ट्रीटमेंट झाली तर रोग पूर्ण बरा होतो अन्यथा दीर्घकाळ ट्रीटमेंट घ्यावी लागते त्याचा खर्च देखील जास्त आहे आणि म्हणूनच केंद्र सरकार राज्य सरकार दोन्ही सरकारांनी आपल्या योजनांमध्ये कॅन्सरचा समावेश केला आहे महाराष्ट्रामध्ये मोठी कॅन्सर ग्रीड आपण तयार करतो या कॅन्सर ग्रीडच्या माध्यमातनं प्रायमरी सेकंडरी टर्शरी अशा तिन्ही प्रकारचे इंटरव्हेन्शन्स वेगवेगळ्या पद्धतीनं करण्याचा प्रयत्न आपला आहे आणि अशातच पुणे महानगरपालिका आणि आपुलकीच्या माध्यमातनं सुरु झालेलं हे जे केंद्र आहे हे निश्चितपणे एक मैलाचा दगड ठरेल आणि या तत्वाने भविष्यकाळामध्ये देखील आपल्याला अनेक अशा प्रकारचे हॉस्पिटल्स तयार करता येतील.**

पुणे महानगरपालिकेनं छत्रपती संभाजी महाराज उद्यानात उभारलेल्या बुधभूषण ग्रंथ रचनाकार छत्रपती श्री संभाजी महाराज यांच्या पूर्णाकृती शिल्पाचं अनावरणही काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं. 10 फूट उंचीच्या या कांस्य शिल्पाच्या जवळ बुधभूषण ग्रंथातल्या 9 निवडक श्लोकांचं मराठी आणि इंग्रजीतून भाषांतर भिंतींवर कोरलं आहे. यावेळी छत्रपती संभाजी महाराजांचा कार्याचं स्मरण करताना मुख्यमंत्री म्हणाले.....

**या शिल्पाची खासियत अशी आहे की छत्रपती संभाजी महाराज बृजभूषण हा जो ग्रंथ आहे तो ग्रंथ लिहित आहेत अशी संकल्पना त्याच्यामध्ये आहे वयाच्या चौदाव्या वर्षी त्या ठिकाणी हा ग्रंथ लिहिण्याचं काम हे छत्रपती संभाजी राजांनी केलं होतं आणि आपल्यापैकी अनेकांना माहिती असेल पण एकूण अकरा भाषा छत्रपती संभाजी राजेंना ज्ञात होत्या मराठी संस्कृत पाली उर्दू अरबी यासोबत ब्रज आणि इंग्रजी या वेगवेगळ्या भाषांमध्ये ते पारंगत होते**

दरम्यान शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी देण्याची तयारी अंतिम टप्प्यात आली असून येत्या 30 जूनपूर्वी यासाठीची योजना जाहीर करू, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यात वार्ताहरांशी बोलताना केली.

पुण्यात हडपसर इथं समान पाणीपुरवठा योजनेंतर्गत नऊ पाण्याच्या साठवण टाक्यांचं लोकार्पण तसंच मुंढवा इथल्या महात्मा फुले चौक मेट्रो आणि दुमजली उड्डाणपुलाचं दूरस्थ पद्धतीने भूमिपूजनही काल फडणवीस यांच्या हस्ते झालं. केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**पंतप्रधान-दौरा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्या पाच देशांच्या दौऱ्यादरम्यान, काल संध्याकाळी नेदरलँडहून दोन दिवसांच्या स्वीडन भेटीसाठी गोथेनबर्ग इथं पोहोचले. मोदी यांनी काल रात्री त्यांचे स्वीडनचे समपदस्थ उल्फ क्रिस्टर्सन यांच्याशी चर्चा केली. द्विपक्षीय संबंध वृद्धिंगत करण्यात पंतप्रधान मोदींनी दिलेलं योगदान तसंच त्यांच्या दूरदर्शी नेतृत्वाचा गौरव म्हणून त्यांना रॉयल ऑर्डर ऑफ द पोलर स्टार, डिग्री कमांडर ग्रँड क्रॉस हा स्वीडनचा सर्वोच्च बहुमान प्रदान करण्यात आला. पंतप्रधान मोदींना मिळालेला हा 31 वा आंतरराष्ट्रीय सन्मान आहे.

**जनगणना**

जनगणना 2027 अंतर्गत स्वगणनेचा टप्पा पूर्ण झाला असून राज्यभरात 11 लाख 14 हजार 277 कुटुंबांनी स्व-गणनेची प्रक्रिया पूर्ण केली आहे. 1 मे ते 15 मे दरम्यान ही प्रक्रिया राबवली गेली. पुणे, मुंबई उपनगर आणि ठाणे जिल्ह्यातल्या नागरिकांनी स्वगणनेत सर्वाधिक सहभाग नोंदवला. पुण्यात 1 लाख 53 हजार 568 कुटुंबांनी स्वगणनेची प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण केली आहे. मुंबई उपगनर जिल्ह्यात 1 लाख 21 हजार 68 आणि ठाणे जिल्ह्यात 1 लाख 16 हजार 512 कुटुंबांनी ही प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण केली. ज्या कुटुंबांनी स्व-गणना प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण केली आहे, त्यांनी त्यांच्या भागात येणाऱ्या प्रगणकाला 'एच' या अक्षराने सुरू होणारा 11 अंकी स्व-गणना ओळख क्रमांक द्यावा, असं आवाहन प्रशासनानं केलं आहे.

**वैष्णव-एक्स्प्रेस रेल्वे**

केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल बंगळुरू आणि मुंबई दरम्यानच्या एका नव्या एक्स्प्रेस रेल्वे सेवेला दूरस्थ पद्धतीने हिरवा झेंडा दाखवला; यामुळे कर्नाटक आणि महाराष्ट्र यांच्यातील रेल्वेसेवेला मोठी चालना मिळाली आहे. यावेळी वैष्णव म्हणाले की, दक्षिण आणि उत्तर कर्नाटकातील जनतेच्या दीर्घकाळापासून प्रलंबित असलेल्या मागण्या आता पूर्ण होत आहेत. बंगळुरू आणि मुंबई दरम्यान 'वंदे भारत स्लीपर' सेवा लवकरच सुरू होणार असल्याचही त्यांनी जाहीर केलं. मुंबई, बंगळुरू आणि इतर प्रमुख शहरांना जोडणाऱ्या रेल्वे जाळ्याचा दीर्घकालीन विस्तार करून ते सात हजार किलोमीटरपर्यंत नेण्याची योजना आहे, असेही वैष्णव यांनी सांगितले.

**नीट पेपर फुटी**

नीट पेपरफुटी प्रकरणाचे धागेदोरे आता लातूरनंतर नांदेडमध्येही पोहोचले असल्याचे स्पष्ट झालं आहे. एका पालकानं आपल्या मुलीसाठी पाच लाख रुपये देऊन पेपर खरेदी केल्याचा आरोप असून, सीबीआयच्या पथकानं काल त्यांची चौकशी केली. अधिक चौकशीसाठी त्यांना मंगळवारी पुण्यातसीबीआय कार्यालयात बोलावण्यात आले आहे. दरम्यान, नीट पेपरफुटी प्रकरणी पुण्यातील आरोपी मनिषा मांढरेला दिल्लीच्या राऊज अवेन्यू न्यायालयाने 14 दिवसांची सीबीआय कोठडी दिली आहे. या प्रकरणाचा तपास सीबीआयने सुरु केल्यानंतर आरोपीला शनिवारी अटक केली होती. नीटच्या जीवशास्त्राच्या पेपरफुटीमध्ये मांढरे प्रमुख सूत्रधार असल्याचं सीबीआयनं सांगितलं.

**हिंदकेसरी**

सातारा इथं आयोजित 52 व्या हिंदकेसरी कुस्ती स्पर्धेची अंतीम  लढत काल पार पडली. महाराष्ट्र केसरी पृथ्वीराज मोहोळ आणि 3 वेळचा उपमहाराष्ट्र केसरी महेंद्र गायकवाड यांच्यात काल रात्री भारतीय शैली प्रकारात झालेल्या लढतीत हिंदकेसरीची गदा महेंद्र गायकवाड यांनी मिळवली. पहिल्याच भिडतीत पृथ्वीराज मोहोळ यांच्या हातास दुखापत झाली. यानंतर झालेल्या दुसऱ्या टकरीत महेंद्र गायकवाड यांना विजयी घोषित करण्यात आलं.

तत्पूर्वी महिला गटात हिंदकेसरी किताबासाठी हरियानाची काजल धोंजक आणि दिल्लीची खुशी दलाल यांच्यात लढत  झाली. त्यामध्ये महिला हिंदकेसरीचा किताब काजल धोंजक हिनं पटकावला. वाशीम इथं 30 आणि 31 मे रोजी होणाऱ्या भारतीय कुस्ती शैलीच्या माती प्रकारातील महिला महाराष्ट्र केसरीच्या चिन्हाचंही यावेळी अनावरण करण्यात आलं.

**माऊली टाकळकर निधन**

वारकरी संप्रदायातील गुरुतुल्य व्यक्तिमत्त्व, हरीभक्तपरायण ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली टाकळकर यांचं काल पुण्यात निधन झालं. संगीत क्षेत्रातील जवळजवळ चार पिढ्यांना लयबद्ध टाळ-साथ करणारे माऊली टाकळकर यांनी नुकतंच वयाच्या शंभरीत पदार्पण केलं होतं. पंडित भीमसेन जोशी आणि गानसरस्वती किशोरी आमोणकर यांच्यापासून आत्ताच्या तरूण कलाकारांनाही माऊली टाकळकर यांनी साथ केली. अखिल भारतीय वारकरी मंडळाच्या माध्यमातून गेली अनेक दशकं त्यांनी भजन सेवा केली. माऊली टाकळकर यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलं आहे. त्यांच्या पार्थिव देहावर काल वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

**हवामान**

राज्यात कमाल तापमानात वाढ झाली आहे. येत्या दोन दिवसात मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट राहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे.

# या बरोबरच हे प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

# नमस्कार